पोलीस स्टेशन चकलांबा

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): बीड **P.S.**(ठाणे): चकलाम्बा

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0068 **Year** (वर्ष): 2026

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 11/03/2026 09:22

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7
2	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7A
3	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	12

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): सोमवार **Date From** (दिनांक पासून): 09/03/2026

Time Period (कालावधी): पहर 6 **Date To** (दिनांक पर्यंत): 09/03/2026

Time From (वेळेपासून): 17:13 बजे

Time To (वेळेपर्यंत): 18:16 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक): 11/03/2026 **Time** (वेळ): 08:58 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ):

Entry No. (नोंद क्र.): 003

Date & Time (दिनांक आणि वेळ): 11/03/2026 08:58 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पश्चिम, 0.1 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पोलीस ठाणे चकलांबा , चकलांबा ,गेवराई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सोपान सोनाजी चिट्टमपल्ले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड,बीड,बीड,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड,बीड,बीड,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9270221064

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	संदिप नाना पाटील		वडील का नाम : नाना	1. 20,जोहरावर अली सोसायटी, विद्यावर्धिनी कालेजच्या पाठीमा, धुळे,धुळे,चकलाम्बा,बीड, महाराष्ट्र,भारत
2	विनोद मधुकर सुरवसे		वडील का नाम : मधुकर	1. चऱ्हाटा रोड,लोकाशा नगर चे पाठीमागे,बीड ,बीड, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत
3	अमोल अंकुशराव येळे		वडील का नाम : अंकुशराव	1. पोलीस ठाणे चकलंबा,चकलंबा, चकलंबा,चकलाम्बा,बीड,

				महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	500 रु. दराच्या 100 नोचा एकुण 50000 रुपये	50,000.00

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत):

फिर्याद लो. प्र.वि.कार्यालय,बीड
दिनांक -11/03/2026

मी सोपान सोनाजी चिट्टमपल्ले, वय 43 वर्षे व्यवसाय-नौकरी,पोलीस उप-अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड मोनं 9270221064, 9518973185

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होऊन पो.ठा.चकलंबा ता.गेवराई जि.बीड येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे दिनांक 31-05-2025 पासून पोलीस उपअधीक्षक म्हणून कार्यरत आहे. दि.09/03/2026 रोजी आम्ही बीड येथे सुरक्षीत ठिकाणी हजर असतांना तक्रारदार श्री.संतोष अंकुशराव नाटकर वय 40 वर्ष व्यवसाय शेती व वाळु वाहतुक रा.राक्षसभुवन ता.गेवराई जि.बीड यांनी बीड येथे सुरक्षीत ठिकाणी समक्ष हजर येवुन त्यांची एका लोकसेवका विरुध्द तक्रार आहे असे कळवुन पंचासमक्ष लेखी तक्रार दिली की, " मी चकलंबा हद्दीमधुन दिवसा व रात्री माझ्या बेंन्झ टिप्परने वाळु वाहतुक करतो. मागील आठ ते दहा दिवसांपुर्वी मला उमापुर चौकीचे सुरवसे यांची राक्षसभुवन येथे भेट झाली असता त्यांनी मला सांगीतले की, तु वाळुची वाहतुक केल्याचे दिसुन येत आहे. तुला चकलंबा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये वाळुची वाहतुक करायची असल्यास पाटील साहेब यांना पंधरा दिवसांसाठी 80,000/- रु. चा हप्ता द्यावा लागेल असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना सदर रक्कम कमी करा असे म्हणालो असता त्यांनी मला श्री. पाटील साहेबांना चकलंबा पोलीस स्टेशनला भेटा असे सांगीतले. परंतु मला पाटील व सुरवसे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आपणाकडे तक्रार देत आहे. मी आज दिनांक 09/03/2026 रोजी पोलीस ठाणे चकलंबा येथे जावुन पाटील साहेब यांची भेट घेणार आहे. भेटी दरम्यान श्री.पाटील साहेब यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास आपण आपले विभागाकडुन कायदेशीर कार्यावही करावी. श्री.पाटील साहेब हे माझ्याकडे लाचमागणी करतील ती रक्कम मी हजर करील." वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने त्याची तक्रार पंचासमक्ष घेवुन तक्रार व कागदपत्रावर आम्ही, पंच,तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथुन आम्ही, पंच व सापळा पथक असे सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या आवश्यक त्या साहित्यासह खाजगी वाहनाने रवाना होवुन तरडगव्हाण रोड चकलांबा शिवारात रोडचे बाजुस सुरक्षीत ठिकाणी थांबुन तक्रारदार श्री.संतोष नाटकर यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि.09/03/2026 रोजी आम्ही लोकसेवक श्री.संदिप पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे चकलंबा हे तक्रारदार यांचेकडे पोलीस ठाणे चकलंबा हद्दी मधुन वाळुची वाहतुक करण्याकरीता लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार व पंच क्र. 1 श्री.गावडे यांना लोकसेवक श्री.संदिप पाटील यांचेकडे पोलीस ठाणे चकलंबा येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचमागणी पडताळणीचे

अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोअं/ श्री. प्रदिप सुरवसे यांनी व्हाईस रकॉर्डर तक्रारदार यांचे बनियनचे डावे बाजुस छाती लगत सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.-1 गावडे यांना लोकसेवक श्री.संदीप पाटील यांची भेट घेण्यासाठी पोलीस ठाणे चकलांबा येथे 17.13 वा. तक्रारदार यांचे कडील स्कॉर्पीओ क्रमांक एम.एच.23 बी.एच.7199 रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 गावडे हे तक्रारदार यांचेकडील स्कॉर्पीओ ने 18.16 वा. तरडगव्हाण येथे सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोअं./प्रदिप सुरवसे यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 श्री.गावडे यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार व पंच क्र.1 श्री.गावडे असे लोकसेवक श्री.संदीप पाटील यांचे पोलीस ठाणे चकलांबा येथील कक्षाकडे गेले त्यावेळी तक्रारदार व लोकसेवक यांची भेट झाली. भेटी दरम्यान तक्रारदार श्री.नाटकर सर मला दोन मिनीटे वेळ दया असे म्हणाले असता श्री.संदीप पाटील यांनी दोन मिनिटे थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक श्री.संदीप पाटील हे तक्रारदार यांना बोला असे म्हणाले असता तक्रारदार यांनी ते काय म्हणतेत डे च वेगळ नाईटच वेगळ कुठतरी मला ऍडजेस्ट करा मी माझ्या गाडयाचा उभ्यात आता असे म्हणाले त्यावेळी श्री.संदीप पाटील ठिकयं असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक यांचे मध्ये वाळु वाहतुक करण्यांसदर्भाने चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, नाईटला चालवली तर पंधरा दिवस पंचेचाळीस हजार रुपये नाईटचे आणि टेंडरवर चालवले तर ते वेगळे असे म्हणतेत. सुरवसे साहेबाला दोन तीन वेळेस बोललो आहे असे सांगितले. त्यावेळी श्री.संदीप पाटील यांनी "दोघ मिळुन देतो टेंडर आणि हे पण" त्यावेळी तक्रारदार यांनी " हा मला दोघ मिळुन दया " असे म्हणाले. त्यावेळी श्री.संदीप पाटील यांनी "पंचेचाळीस मध्ये नाही होणार मी त्यांना पंधरा दिवसाचे साठ हजार सांगितलेत.. तुला माझ्याकडुन दिवसा परमिशन " त्यावेळी तक्रारदार हे दिवसा मला नको असे म्हणाले. त्यावर श्री.संदीप पाटील दिवसा टेंडरला वापर संध्याकाळी सुरळेगावला वापर असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की त्यांच लगेच डन करा मी एक दीड घंटयात जाता जाता सुरवसे साहेबांना पन्नासीक हजार रुपये देतो असे म्हणाले. त्यानंतर श्री.संदीप पाटील यांनी "साठ य.. साठ य .." असे म्हणून 60,000/- रु.लाचेची मागणी केली त्यावेळी तक्रारदार यांनी माझ्यासाठी पन्नास करा असे म्हणाले. त्यावर श्री.संदीप पाटील म्हणाले की, आमचे शिवाय तुमच्या जवळ दुसरा कोणी येणार नाही असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी एक दिड घंटयात 50,000/- देतो अनं 10,000/- उद्या परवा देतो त्यावर श्री.संदीप पाटील हे "पंधरा दिवस हं" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी तुम्ही लगेच माझ्या देकत सुरवसे साहेबांना फोन करा संतोष येईन मना असे सांगितले. त्यानंतर श्री.संदीप पाटील यांनी त्यांचे कडील मोबाईल वरुन श्री.सुरवसे यांना फोन करुन "संतोष येत आहे भेट घे" असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे "चालतंय येऊ सर.. मी जाता जात एक दोन घंटयात भेटुन जातो" असे म्हणाले. तडजोडी अंती श्री.सुरवसे यांचे मार्फतीने 60,000/- रुपये लाचरक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य करुन त्यापैकी 50,000/- रु. लागलीच व उर्वरित 10,000/- नंतर स्विकारण्याचे मान्य केले.

लाचमागणी पडताळणी वरुन लोकसेवक श्री.विनोद सुरवसे, पोलीस अंमलदार यांचे विरुध्द पोलीस चौकी उमापुर येथे लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे तक्रारदार यांना सांगितले. त्यावरुन तरडगव्हाण रोड चकलांबा शिवार येथे सुरक्षीत ठिकाणी खाजगी वाहनामध्ये पंचासमक्ष आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासीनपावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या ज्यामध्ये 500/रु दराच्या 100 नोटा असे एकुण 50,000/- रुपये लाच रककमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. तक्रारदार यांना लाचस्वीकृती नंतर करावयाचा ईशारा आमचे मोबाईलवर कॉल करुन " घरीच स्वयंपाक कर जेवायला यायलो " असे म्हणने बाबत नेमुन दिला व वेळे अभावी लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करुन लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा सापळा कारवाई झाल्यानंतर एकत्रीत करण्यात येणार असल्याचे आम्ही पंच व तक्रारदारास सांगीतले.

सापळा पुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथकासह तरडगव्हाण रोड चकलांबा शिवार येथील सुरक्षीत ठिकाणावरुन उमापुर शिवार उमापुर येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आलोत. त्यानंतर तक्रारदार यांचे विनंतीवरुन लोकसेवक श्री.सुरवसे यांचे भेटीचे ठिकाण निश्चीत करण्यासाठी तक्रारदार यांचे मोबाईल वरुन लोकसेवक यांचे मोबाईलवर कॉल करुन तुम्ही कुठे आहेत असे विचारले असता लोकसेवक श्री.सुरवसे यांनी महारटाकळीला आलो असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी चकलांबा फाटयावर कधी येणार आहात असे विचारले असता श्री.सुरवसे यांनी 10 ते 15 मिनीटे लागतील असे सांगितले व उमापुर फाटयावर येतो असे म्हणाले. त्यावेळी

तक्रारदार यांनी जळगाव पाटी ला या असे सांगितल असता लोकसेवक श्री.सुरवसे यांनी येतो असे सांगितले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथकासह जळगाव पाटीच्या काही अंतरावर लोकसेवक श्री.सुरवसे यांची वाट पाहत थांबलोत. त्यानंतर काहीवेळाने श्री.सुरवसे यांना तक्रारदार यांनी कॉल केला असता श्री.सुरवसे यांनी बाहेर आलतो असे सांगुन महार टाकळी जवळ आल्यानंतर फोन करतो असे म्हणाले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथकासह महारटाकळी शिवारात लोकसेवक श्री.सुरवसे यांची वाट पाहत थांबलोत. काहीवेळानंतर तक्रारदार यांनी श्री.सुरवसे यांना कॉल करुन कुठे आहे असे विचारले असता श्री.सुरवसे यांनी तिथेच आहेत का असे म्हणुन पुढे या गलधरच्या हॉटेलपशी असे सांगितले.

त्यानंतर लागलीच व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.1 श्री.गावडे यांना लोकसेवक श्री.सुरवसे यांची भेट घेवुन लाच रक्कम देण्यासाठी गलधरच्या हॉटेलकडे 22.28 वा. रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 श्री.नाईक व सापळा पथक खाजगी वाहनाने रवाना झालो. तक्रारदार व पंच क्र. 1श्री.गावडे असे गलधरच्या हॉटेलकडे जाताना दिसले. आम्ही गलधर हॉटेलच्या परिसरात सापळा लावुन तक्रारदार यांचे इशाऱ्याची वाट पाहत थांबलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार हे इशारा न करता वापस निघाले त्यांचे पाठो-पाठ आम्ही व सापळा पथक रवाना झालोत व महारटाकळी शिवार येथील सुरक्षीत ठिकाणी 23.39 वा. हजर आलोत. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतले व तक्रारदार, पंच क्र.1 यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार यांची व लोकसेवक श्री. सुरवसे यांची भेट झाली नाही. लोकसेवक श्री.सुरवसे यांनी तक्रारदार यांना भेटण्यास येतो असे म्हणाले परंतु श्री. सुरवसे हे गलधर हॉटेल जवळ आले नाहीत.

त्यावर तक्रारदार यांनी आम्हास विनंती केली की खुप रात्र झाली आहे आता लोकसेवक श्री.सुरवसे हे येणार नाहीत.उर्वरीत सापळा कारवाई उदईक दि.10/03/2026 रोजी करण्यात यावी. त्यानंतर आम्ही सापळा कारवाई स्थगीत करुन तक्रारदार श्री.नाटकर यांचेकडील ऍथ्रोसिन पावडर लावलेली लाचरक्कम 50,000/- रुपये लिफाफामध्ये बंद करुन ताब्यात घेतली व तक्रारदार यांच्या विनंतीवरुन लोकसेवक श्री.सुरवसे यांचे विरुध्द दि. 10/03/2026 रोजी उमापुर चौकी उमापुर येथे सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन पंच व सापळा पथकास गोपनियते बाबत सुचना दिल्या. तसेच दिनांक 09/03/2026 रोजीचा लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई स्थगीतीचा पंचनामा केला.

दिनांक 10/03/2026 रोजी आम्ही, पंच व सापळापथक असे सापळा कारवाईसाठी लागणारे आवश्यक ते सर्व साहित्य सोबत घेवुन पंच व स्टाफसह लाप्रवि, बीड येथुन रवाना होवुन सुरक्षीत ठिकाण खळेगाव शिवार येथे हजर आलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार सुरक्षीत ठिकाणी हजर आले. आम्ही तक्रारदार, पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचनांची उजळणी करुन दिली. त्यावेळी पोह/बीडकर, प्रदीप सुरवसे यांना श्री.संदीप पाटील,सपोनि, पो.स्टे.चकलांबा यांना ताब्यात घेणेकामी चकलांबा येथे रवाना केले. त्यानंतर खाजगी वाहनाचे बॅग मधुन लाचरकमेचा लिफाफा काढुन त्यामधील लाच रक्कम 50,000/- रुपये तक्रारदार श्री.नाटकर यांचे समोरील पॅन्टचे उजवे बाजुचे खिशात ठेवुन त्यांना सुचनांची उजळणी करुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांचे विनंती वरुन भेटीचे ठिकाण निश्चीत करण्यासाठी लोकसेवक श्री.सुरवसे यांना फोनवर संपर्क केला असता श्री.सुरवसे यांनी तक्रारदार यांना उमापुर चौकी येथे भेट घेण्यासाठी बोलावले. त्यानंतर आम्ही सुचनांची उजळणी करुन देवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री.नाटकर व पंच क्रमांक 1. श्री.गावडे यांना लोकसेवक श्री.सुरवसे यांचे उमापुर चौकी येथे 20.50 वा.पाठवुन त्याचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 श्री.नाईक व सापळा पथक खाजगी वाहनाने रवाना झालो. तक्रारदार व पंच क्र.1 श्री. गावडे असे उमापुर चौकी येथे जाताना दिसले. आम्ही उमापुर चौकीचे परीसरात सापळा लावुन तक्रारदार यांचे इशाऱ्याची वाट पाहत थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन आमचे मोबाईलवर 21.03 वा. कॉल करुन त्यांना नेमुण दिलेला इशारा " घरीच स्वयंपाक कर जेवायला यायलो " केला.

त्यांनतर माझे सुचनेवरून सापळा पथक तात्काळ सक्रिय होवून पंच क्र 02 श्री.नाईक यांचे सह घटनास्थळी हजर आले. तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केला. त्यांनतर मी पंच क्र. 01 श्री.गावडे यांना लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.01 श्री.गावडे यांनी उमापुर चौकी समोर उभे असलेले इसमाकडे आंगुली निर्देष करून हेच ते श्री.सुरवसे असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार श्री.नाटकर यांचेकडुन डाव्या हाताने लाच रक्कम 50,000/- रु. स्विकारून त्यांनी अंगावर परिधान केलेल्या पॅन्टचे पाठीमागील डाव्या बाजूच्या खिशात ठेवली असे सांगितले. त्यांनतर लोकसेवक श्री.सुरवसे यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवर रंगेहात पकडण्यात आले. त्यांनतर मी लोकसेवक श्री.सुरवसे यांना माझी, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली त्यांनतर लोकसेवक श्री.सुरवसे यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विनोद मधुकर सुरवसे, वय 36 वर्ष व्यवसाय नौकरी पोलीस कॉन्स्टेबल 1053, दुरक्षेत्र उमापुर पो.ठा.चकलांबा ता.

गेवराई जि.बीड रा.चन्हाटा रोड, लोकाशा नगरचे पाठीमागे बीड असे सांगितले. त्यांनतर मी लोकसेवक श्री.सुरवसे यांना स्विकारलेल्या लाचेची रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांचे अंगावर परिधान केलेल्या पॅन्टचे पाठीमागील डावे बाजूच्या खिशात ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेवरुन पंच क्र 02 श्री.नाईक यांनी लोकसेवक श्री.सुरवसे यांनी परिधान केलेल्या जिन्स पॅन्टच्या पाठीमागील डाव्या बाजूच्या खिशातून लाचेचे 50,000/- रूपये काढून घेवून सदर नोटाचे क्रमांक व सापळा पुर्व पंचनाम्यातील नोटाचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली तसेच माझे सुचनेवरून आम्ही सर्वजन लोकसेवक श्री.सुरवसे यांचे सह पोलीस चौकी उमापुर मध्ये जावुन उमापुर चौकीच्या एका रुमचा दरवाजे, खिडक्या व लाईट बंद करुन कृत्रीम अंधार करुन लोकसेवक श्री. सुरवसे यांचे हात, लाचेची रक्कम अल्ट्राव्हालेंट बॉटरीच्या सहाय्याने चेक केले असता लोकसेवक श्री.सुरवसे यांच्या उजव्या हातावर व लाचेच्या रक्कमेवर, लोकसेवक श्री.सुरवसे यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजूच्या खिशाच्या तोंडास हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यांनंतर पुन्हा माझे सुचनेवरून तक्रारदार श्री. नाटकर यांचे हातावर अल्ट्राव्हालेंट बॅटरीच्या सहाय्याने चेक केले असता तक्रारदार यांच्या उजव्या हाताचे बोटावर ठिक ठीकाणी व पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशा तोंडास हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर घटनास्थळावर प्राथमिक कारवाई करुन लागलीच आम्ही पोह/बीडकर व प्रदीप सुरवसे यांना आलोसे श्री.पाटील, सपोनि, पो.ठा.चकलांबा यांचा चकलांबा येथे शोध घेवुन ताब्यात घेणे बाबत कळविले. त्यानंतर मी, सापळा पथक, दोन्ही पंच, लोकसेवक श्री.सुरवसे असे पोलीस चौकी उमापुर येथे असतांना पोह/बीडकर व प्रदीप सुरवसे हे पोलीस चौकी उमापुर येथे हजर आले व त्यांनी सपोनि/पाटील यांना आमचे समक्ष हजर केले. आम्ही सपोनि/पाटील यांना आमचा व सापळा पथकाचा परिचय करुन दिला. त्यानंतर सपोनि/पाटील यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावगाव कळविले की, संदीप नाना पाटील, वय 46 वर्ष व्यवसाय नौकरी, सहा.पोलीस निरीक्षक तथा प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे चकलांबा ता.गेवराई जि.बीड रा.सावता चौका जवळ चकलांबा ता.गेवराई जि.बीड मुळ रा.जोहरावर अली सोसायटी प्लॉट नं.20 ता.जि.धुळे विद्यावर्धीनी कॉलेजच्या पाठीमागे धुळे असे कळविले. सपोनि/पाटील यांना त्यांचे विरुध्द झालेल्या सापळा कारवाई बाबत माहिती देवुन आम्ही शासकीय वाहनाने व तक्रारदार नाटकर हे त्यांचेकडील स्कॉर्पीओने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे हजर आलोत.त्यानंतर मी सापळा कारवाई दरम्यानचे व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण तक्रारदार व पंचासमक्ष ऐकले असता तक्रारदार व लोकसेवक श्री.सुरवसे यांची सापळा कारवाई दरम्यान भेट झाली असता त्यांचेमध्ये तक्रारदार यांचे वाळु वाहतुकीचे संबंधाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी 50,000/- रु.लाच रक्कम श्री.सुरवसे यांना देवुन उर्वरित 10,000/- रु. उद्या देतो असे म्हणून लाच रक्कम दिली. त्यावेळी पोह/अमोल येळे यांना लोकसेवक श्री. सुरवसे यांनी बोलावुन घेवुन ते माझे सिनीयर आहेत असे सांगितले. त्यावेळी पोह/अमोल येळे यांना साहेबांनी किती म्हणतेत ते सांगा असे तक्रारदार यांना म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक येळे यांना काल साहेब बोललेत मला असे म्हणाले त्यावेळी श्री.अमोल येळे यांनी "सहा पेटया तसेच सहा जिल्हा परिषद अशा कोडमध्ये अरं करनां.. अ "असे म्हणून लोकसेवक श्री.विनोद सुरवसे व श्री.संदीप पाटील,सपोनि यांना तक्रारदारास लाचरक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यावरुन लोकसेवक श्री.संदीप पाटील, सपोनि यांनी लाचरक्कम 50,000/- रु.लोकसेवक श्री. सुरवसे, पोलीस चौकी उमापुर यांचे करवी स्विकारल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक पोह/अमोल येळे यांनी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्यांनतर तसा सविस्तर यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा करण्यात आला. दिनांक 09/03/2026 रोजी 17.13 वा.ते 18.16 वा. चे सुमारास पोलीस ठाणे चकलांबा येथील सपोनि/संदीप पाटील यांचे कक्षात यातील मुळ तक्रारदार श्री.संतोष अंकुशराव नाटकर यांना त्यांचे बेंन्झ टिप्परने चकलांबा पोलीस ठाणेचे हद्दीमधुन दिवसा व रात्री वाळु वाहतुक करण्यासाठी 15 दिवसाचे 60,000/- रुपये दयावे लागतील असे म्हणुन 60,000/- रु.लाचेची सपोनि/संदीप पाटील यांनी मागणी करुन लोकसेवक श्री.विनोद सुरवसे, पोशि/1053 पोलीस चौकी उमापुर यांचे करवी 50,000/- रु.लागलीच स्विकारण्याचे मान्य करुन उर्वरित 10,000/- रु.दोन तीन दिवसात स्विकारण्याचे मान्य करुन दिनांक 10/03/2026 रोजी 21.03 वा. लाच रक्कम 50,000/- उमापुर चौकीचे समोर स्विकारले. त्यावेळी लोकसेवक पोह/1533 अमोल येळे, पोलीस ठाणे चकलंबा यांनी तक्रारदारास लाचरक्कम देण्यास प्रोत्साहन देवुन निघुन गेले. लोकसेवक श्री.विनोद सुरवसे,पोशि/1053 पोलीस चौकी उमापुर यांना पंचासमक्ष लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले. तसेच श्री.संदीप नाना पाटील, वय 46 वर्ष व्यवसाय नौकरी, सहा.पोलीस निरीक्षक तथा प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे चकलांबा ता.गेवराई जि.बीड रा.सावता चौका जवळ चकलांबा ता.गेवराई जि.बीड मुळ रा.जोहरावर अली सोसायटी प्लॉट नं.20 ता.जि.धुळे विद्यावर्धीनी कॉलेजच्या पाठीमागे धुळे जि.धुळे यांनी स्वातासाठी व इतरासाठी लाच मागणी करून स्विकारल्याने यांना ताब्यात घेतले म्हणुन माझी 1) संदीप नाना पाटील, वय 46 वर्ष व्यवसाय नौकरी, सहा.पोलीस निरीक्षक तथा प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे चकलांबा ता.गेवराई जि.बीड रा.सावता चौका जवळ चकलांबा ता.गेवराई जि.बीड मुळ रा.

जोहरावर अली सोसायटी प्लॉट नं.20 ता.जि.धुळे विद्यावर्धीनी कॉलेजच्या पाठीमागे धुळे वर्ग - 2 व 2) विनोद मधुकर सुरवसे, वय 36 वर्ष व्यवसाय नौकरी पोलीस कॉन्स्टेबल 1053, दुरक्षेत्र उमापुर पो.ठा.चकलंबा ता.गेवराई जि.बीड रा.चन्हाटा रोड, लोकाशा नगरचे पाठीमागे बीड वर्ग - 3 3) लोकसेवक पोह/1533 अमोल येळे, नेमणुक पोलीस ठाणे चकलंबा यांचेविरुध्द कलम 7,7अ, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे फिर्याद आहे. ही फिर्याद दिली ती संगणकावर टंकलिखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ANANTA PANDURANG TANGDE(SI (Sub-Inspector)) / PSI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन चकलंबा

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): ANANTA PANDURAN
Rank(पद): SI (Sub-Inspector)
No.(सं.): PSI

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the (If known / seen)**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	Sex (लिंग)	Date/Year of Birth (जन्म तारीख/ वर्ष)	Build (बांधा)	Height (cms.) (उंची(सें. मी.))	Complexion (रंग)	Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष	26/05/1980				चेचक के दाग: NO
2	पुरुष	18/06/1989				चेचक के दाग: NO
3	पुरुष	03/06/1984				चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	Teeth (दात)	Hair (केस)	Eyes (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)	Place Of (का स्थान)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**